Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- VII ISSUE- IV APRIL 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# महाराष्ट्रातील सिंचन विकास महामंडळ व क्षेत्र विकास

**डॉ. एस. पी. झांबरे,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस. एस. जायस्वाल महाविद्यालय,
अर्जुनी/मोर, जि. गोंदिया

**सारांश :**

*स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात प्रकल्पांद्वारे सिंचनाचा प्रयत्न फारच अल्प प्रमाणात झालेला दिसून येतो. स्वातंत्र्यानंतर प्रामुख्याने महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पाटबंधारे प्रकल्पांद्वारे सिंचन क्षमता निर्मितीच्या प्रयत्नांना गती देण्यात आली. यासाठी सिंचन आयोग व सिंचन विकास महामंडळ स्थापन करण्यात आली. या सोबतच क्षेत्र विकासाची कार्य सुद्धा करण्यात आली असे असतानाही महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत आजही स्वयंपूर्ण झालेला नाही करिता प्रस्तुत शोधनिबंधात चर्चा केली आहे.*

***कीवर्ड :*** *महाराष्ट्र राज्य, सिंचन आयोग, सिंचन विकास महामंडळे, क्षेत्र विकास.*

## प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्यामध्ये शेतीचे चित्र समिश्र स्वरूपाचे दिसून येते. कोरडवाहू शेती, अन्नधान्याची तूट, राष्ट्रीय सरासरीपेक्षा शेतीची उत्पादकता कमी, उसाच्या उत्पादनात लक्षणीय वाढ, तेलबियांच्या उत्पादनात घट, दुधाच्या उत्पादनात लक्षणीय वाढ असे महाराष्ट्र राज्याच्या भू–क्षेत्राचे संमिश्र चित्र आपणास पहावयास मिळते. येथील शेती मुख्यत्वे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील फार मोठे क्षेत्र कमी पर्जन्यमान असलेल्या प्रदेशात येते. राज्यातील अन्नधान्य उत्पादन हे प्रामुख्याने हवामानाच्या स्थितीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतक–यांसाठी उत्पन्नात अनिश्चितता निर्माण होते. म्हणजेच महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत अजूनपर्यंत स्वयंपूर्ण झालेला नाही.

## महाराष्ट्रातील सिंचनाचा इतिहास :

सिंचन शेती महाराष्ट्राला नवीन नाहो. त्याचे बीज हजारो वर्षापूर्वी कौटिल्याचा काळाच्या अगोदर सापडते. हजारो वर्षापासून तलावात पाणी साठवून व विहिरीद्वारे भूजलातील पाणी उपसून दुबार व बारमाही पिके घेऊन समृद्धीकडे वाटचाल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाचा जसजसा विकास होत गेला तसतसे सिंचनाचे स्वरूप बदलत गेले व त्याचा विकास होत गेला. त्याचेच विकसित रूप म्हणजेच मोठे तलाव, त्यापासून अनेक कालवे, वितरकांचे जाळे, पंपाने पाणी उपसणे, ठिबक सिंचन योजना, तुषार सिंचन योजना इत्यादी आधुनिक पद्धती विकसित झाल्या.

महाराष्ट्राच्या निरनिराळया भागातील पिके व सिंचनाच्या पाणी पुरवठ्याची रचना यामध्ये त्या–त्या भागातील नैसर्गिक व भौगोलिक परिस्थितीनुसार विविधता दिसून येते. प्रत्येक भागातील पिक रचना ही त्या भागातील हवामान व भौगोलिक परिस्थिती व पाण्याची उपलब्धता त्यानुसार वेगवेगळे दिसून येते. या सर्वांमध्ये मात्र एक गोष्ट सारखी दिसून येते आणि ती म्हणजे तेथील स्थानिक राज्याकडून सिंचनाच्या विकासाला प्रोत्साहन व सहाय्य दिले जात होते. परंतु सिंचन व्यवस्थापन व देखभाल मात्र लोकांच्या हाती असायची त्यात मात्र राजा हस्तक्षेप करीत नव्हता. ब्रिटिशांच्या कालावधीत मुंबई प्रांतात आधुनिक प्रकारची सिंचनाची कामे झाली. परंतु तशी कामे विदर्भ व मराठवाड्यात झाली नाही.

## सिंचन आयोग :

सिंचन विकास कार्यक्रम अधिक वेगाने नेण्याकरिता तसेच निर्माण करण्यात आलेल्या सिंचन क्षमतेचा वापर पूर्णपणे करण्याकरिता, व्यवस्थापनामध्ये सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्र शासन नेहमीच तत्पर व जागरूक राहिले आहे. याकरीता मागील शतकांमध्ये विविध समित्या व आयोग नेमले गेले.

प्रथम 1937 साली श्री. विश्वश्वरया यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन चौकशी नेमली गेली. त्यानंतर 1962 साली. श्री. रा. गो. बर्वे याच्या अध्यक्षतेखाली पहिला सिंचन आयोग नेमण्यात आला. या सिंचन

आयोगाने राज्याची सिंचन क्षमता 53 लाख हेक्टर नमूद केली होती. तर त्या वर्षी फक्त सुमारे 4 लाख हेक्टर जमिनीस सिंचन व्यवस्था उपलब्ध होतो. परंतु दरम्यानच्या काळात झालेली लोकसंख्या वाढ, बदलते राहणीमान, औद्योगीकरण यामुळे पाण्याच्या मागणीत वाढ झाली. त्यामुळे पाण्याच्या गरजाचा प्राधान्यक्रम ठरविणे अगत्याचे झाले आहे. पुढे 1977 साली श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. परंतु सरकार बदलल्याने तो बरखास्त करण्यात आला. 1981 मध्ये ईश्वरलाल जैन यांची एक सदस्य समिती नेमण्यात आली. नंतर लगेच श्री. सुरेशदादा जैन याची अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती नेमण्यात आली.

वरील बदललेल्या परिस्थितीचा विचार करता राज्यातील सिंचन विषयक प्रश्न व जलसंपत्तीचा विकासाच्या संबंधित बाबीचा अद्ययावत अभ्यास करण्यासाठी व त्याबाबत अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दुस—या सिंचन आयोगाची डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली 1995 साली स्थापना केली. महाराष्ट्रातील उपलब्ध पाणी व वाढती मागणी यांचा वेळ घालणे अतिशय अवघड काम झाले होते. त्यासाठी सिंचन व्यवस्थेच्या वेगळा विचार न करता पाण्याच्या एकूण उपलब्धतेच्या संदर्भात औद्योगिक, ग्रामीण, नागरी आणि सिंचन या सर्वाच्या एकत्रित विचार यापुढे आवश्यक ठरणार आहे आणि म्हणूनच आयोगाचे नाव 'महाराष्ट्रातील जल व सिंचन आयोग' असे ठेवण्यात आले. दुस—या सिंचन आयोगाचे उद्दिष्ट 65 लाख हेक्टर चे वर कृषी क्षेत्र पाटबंधारे ओलिताखाली आणण्याचे राहील असा अंदाज आहे.

उपलब्ध पाणी अधिक क्षेत्राला देण्याकरिता सर्वश्री दऊसकर, दांडेकर आणि दत्ता देशमुख यांची एक समिती नेमली होती. या समितीने कालव्याचे पाणी पिकांना आठ महिने देऊन उन्हाळयात ऊसाला किंवा इतर बागायती पिकांना विहिरीचे पाणी देण्याची शिफारस केली होती. सिंचन प्रकल्पाच्या कालव्यांची व त्यावरील बांधकामाची संकल्पचित्रे तयार करण्याची पद्धत तपासून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी सर्वश्री देऊसकर, साळदाणा आणि गुप्ते यांची एक समिती नेमली होती. या सर्व समित्या व आयोगांनी फार उपयुक्त सूचना केल्या होत्या.

**सिंचन विकास महामंडळ :**

**अ) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ :**

कृष्णा आंतरराज्य पाणी वाटप तंटा लवादाच्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यास कृष्णा खो—यातील 599 अब्ज घनफूट पाण्याचा वापर अनुज्ञेय आहे. त्या निर्णयात इ. स. 2000 नंतर पुनर्विलोकनाची तरतूद होती. त्यामुळे ते लक्ष इसवी सन 2000 पर्यंत साध्य करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने या महामंडळाची स्थापना केली असून कृष्णा खो—यातील सर्व म्हणजे 35 मोठ्या, 53 मध्यम व 418 लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम या महामंडळाकडे हस्तांतरित केले आहे. ही कामे पूर्ण करण्यासाठी 11,660 कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. शासनाने भागभांडवल म्हणून 3,500 कोटी रुपये द्यावयाचे असून उर्वरित रक्कम महामंडळाने खुल्या बाजारातून कर्ज रोख्याद्वारे उभारावयाची आहे. 2000 पर्यंत या खो—यात 21.59 लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण करण्याचे ठरविण्यात आले हाते.

**ब) विदर्भ सिंचन विकास महामंडळ :**

या महामंडळाची स्थापना 1977 मध्य केली आहे. विदर्भातील बांधकामाधीन अशा नऊ मोठ्या व एका मध्यम पाटबंधारे प्रकल्पांची कामे या महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आली. त्या व्यतिरिक्त 5 मोठे, 28 मध्यम आणि 55 लघुपाटबंधारे प्रकल्प मिळून एकूण 88 प्रकल्प ह्या महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आले. हया प्रकल्पाच्या उर्वरित बांधकामाचा खर्च अंदाजे 8,164 कोटी रुपये इतका आहे. ते सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यावर 11 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल. शासनाकडून 2,245 कोटी रुपये 10 वर्षाच्या कालावधीत सुलभ हप्त्याने मिळणार आहे.

**क) कोकण सिंचन विकास महामंडळ :**

महाराष्ट्र शासनाने कोकण सिंचन विकास महामंडळाची स्थापना डिसेंबर 1997 मध्ये केली आहे. एक मोठा, चार मध्यम आणि 33 लघुपाटबंधारे प्रकल्प या महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आले. पकल्प पूर्ण झाल्यावर 109 लाख हेक्टर इतकी अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होईल. या प्रकल्पाचा एकूण खर्च 890 कोटी रुपये असून त्यापैकी 273 कोटी रुपये राज्य शासनाकडून सहा वर्षात तर उर्वरित रक्कम महामंडळाने कर्ज रोख्याद्वारे उभारलो आहे.

**ड) तापी सिंचन विकास महामंडळ :**

महाराष्ट्र शासनाने तापी सिंचन विकास महामंडळाची स्थापना मार्च 1997 मध्ये केली आहे. या महामंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये जळगाव, धुळे नाशिक या जिल्ह्यातील 6 मोठे, 23 मध्यम आणि 315 लघुपाटबंधारे प्रकल्प समाविष्ट असून त्याच्या बांधकामाचा खर्च 4,675 कोटी रुपये होता. त्यापैकी 1,400 कोटी रुपये राज्य शासनाकडून सहा वर्षात तर उर्वरित रक्कम दहा वर्षात महामंडळाने कर्जरोख्याद्वारे उभारण्यात येईल. ती कामे पूर्ण केल्यावर 523 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल.

**इ)गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ :**

महाराष्ट्र शासनाने गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळाची स्थापना ऑगस्ट 1998 मध्ये केली आहे. या महामंडळाद्वारे गोदावरी खो–यातील 13 मोठ्या, 22 मध्यम आणि 303 लघुपाटबंधारे प्रकल्प या महामंडळाकडे हस्तांतरित 7 वर्षात पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. 1,256 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल असा अंदाज होता. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च 3,900 कोटी रुपये असून त्यापैकी 1,300 कोटी रुपये राज्य शासनाकडून तर उवरित रक्कम महामंडळाने कर्जरोख्याद्वारे उभी करणे होते.

**क्षेत्रविकास :**

महाराष्ट्र राज्यात सिंचनाच्या माध्यमातून पाटबंधा–याच्या सहाय्याने जलसिंचन क्षमता निर्माण केली गेली. तरी क्षेत्राच्या विकासासाठी नुसता पाणी पुरवठा वाढवून उपयोग होत नाही. तर जमिनीचे सपाटीकरण, पाण्याच्या निच–याची सोय, शेतातून पार काढणे, रस्ते बांधने, खते–बियाणे, पतपुरवठा या सोयी वाढवाव्या लागतात. म्हणजेच विकासाचा सर्वस्पर्शी कार्यक्रम राबवावा लागतो. पाचव्या पंचवार्षिक योजना काळात असे क्षत्र विकास कार्यक्रम सुरू करण्यात आले. सध्या राज्यात दहा लाभ क्षेत्र विकास प्राधिकरणे आहेत.

राज्यात लाभ क्षेत्र विकासाचा कार्यक्रम जसा राबविला गेला. तसा पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम राबविला गेला नाही. त्यामुळे पाणी मुरण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. झाडांची तोड झाल्याने जमिनीत पाणी मुरण्याचो व्यवस्थाच कमी झाली. रासायनिक खतांचा वापर प्रमाणाबाहेर होत असल्याने जमिनीची शक्ती क्षीण होत आहे. जमिनीतील पोकळी कमी झाली आहे. त्यामुळे पाणी मुरत नाही. परिणामी जमिनीची उत्पादकता कमी होऊन अपेक्षित उत्पादन प्राप्त होत नाही.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्र राज्यात कृषी उत्पादन वाढावे म्हणून जलसिंचनाच्या विविध स्त्रोतांचा विस्तार करण्यासाठी विविध आयोग व सिंचन विकास महामंडळ स्थापन केली असली तरी उत्पादनावर अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. म्हणूनच राज्यातील पाटबंधारे विकास योजनांचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. त्यासोबतच क्षेत्र विकास कार्यक्रमांना सुद्धा न्याय देणे आवश्यक आहे. राज्यातील पाटबंधा–याच्या पाण्याचा अधिक न्याय्य, समतोल व उत्पादक वापर होण्यासाठी पाटाचे पाणी वर्षभर देण्याऐवजी गरज असेल तेव्हा पाणी या नीतीचा अवलंब व्हायला हवा. सोबतच 'नवीन जलनिती' तयार करून क्षेत्र विकासाच्या आधुनिकीकरणावर खर्च वाढवून त्याचप्रमाणे संशोधनाच्या माध्यमातून कृषी उत्पादन वाढविता येऊ शकते.

**संदर्भ :**

1. दास्ताने संतोष (2006) : 'महाराष्ट्र 2006', दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे
2- Annual Report, Ministry of Water Resources Water Related Statistics, Government of India, 2004.
3. झाडे एस. व्ही., देशपांडे प्र. र. (2012) : ''महाराष्ट्रातील जलसंपदा : कालच आज आणि उद्या'', आशीर्वाद पब्लिकेशन, नागपुर
4. सावंत प्रकाश (2002) : 'महाराष्ट्राचा भूगोल', फडके प्रकाशन, कोल्हापूर
5. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, 2012–13, महाराष्ट्र शासन, मुंबई